# मुंबई विद्यापीठ

**<u>परिपत्रक</u>** :— क्र. टीएएएस(युटी/सीटी)/ ०१ /२०१७—२०१८

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमधील दिनांक ४ मे, २०१६ व दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी केलेली अनुक्रमे तिसरी व चौथी सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण—२०१७/प्र.क्र.३३/१७/विशि—१, दिनांक ४ मार्च, २०१७ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करावी. सदर सुधारित अधिसुचनेनुसारच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक ४ मार्च, २०१७ पासून लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१७०३०४१३१८३१२५०८ आहे.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— ३ एप्रिल, २०१७

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२,
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १.
३. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.
४. मा. विभागीय सहसंचालक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, संचालक (ॲकॅडमिक प्लॅनिंग) फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूनेमधील दिनांक ४ मे , २०१६ व दिनांक, ११ जुलै, २०१६ रोजी केलेली अनुक्रमे तिसरी व चौथी सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१७/ प्र. क्र. ३३/१७/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०४ मार्च, २०१७

वाचा

१) शासन निर्णय क्रमांकः एनजीसी-२००९ (२४३/०९) /विशि-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९
२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-३.१/२००९, दिनांक ३० जून, २०१०
३) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०११/(२५/११)/ विशि-१, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११
४) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-१-२/२००९, (EC/PS), दिनांक १३ जून, २०१३
५) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/ प्र. क्र. ८८/१६/विशि-१, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६
६) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS Amendment), दिनांक ४ मे, २०१६.
७) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS Amendment), दिनांक ११ जुलै, २०१६.
८) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F.१-२/२०१६ (PS) Amendments, दिनांक १० जानेवारी, २०१७.

प्रस्तावना :-

विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्र. २ येथील दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालये / संस्था मधील शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या, सदर पदांची किमान शैक्षणिक अर्हता, इ. निश्चित केलेल्या आहेत. तसेच सदर पदांवरील अध्यापकांच्या वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, वेतनवाढी, इत्यादी बाबत आदेश दिलेले आहेत. सदर अधिसूचना संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १५ फेब्रवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्यात आली आहे. संदर्भाकित क्र. ४ येथील दिनांक १३ जून, २०१३ च्या अधिसूचनेन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेत केलेली दुसरी दुरूस्ती संदर्भाकित क्र. ५ येथील दिनांक १५

ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्रमांक ६ व ७ येथील अधिसूचनेन्वये दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये केलेल्या (तिसरी व चौथी) सुधारणा राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

१. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये संदर्भाधीन क्र. ६ व संदर्भाधीन क्र. ७ येथील अनुक्रमे दिनांक ४ मे, २०१६ व दिनांक ११ जुलै, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये केलेल्या अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या सुधारणेतील शिफारशी / निर्देश याबाबत साकल्याने विचार करून त्यासंदर्भात शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ.क्र. | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० मधील परिच्छेद क्र. | शासन आदेश |
|---|---|---|
| १ | परिच्छेद क्र. ३.३.१, ४.४.१, ४.४.२.१, ४.४.२.२, ४.४.२.३, ४.५.३ व ४.६.३ | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ६ येथील दिनांक ४ मे, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. |
| २ | परिच्छेद क्र. ३.४.१, ५.१.६ (d), ६.०.५ (i) | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ७ येथील दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेन्वये सुधारित केल्याप्रमाणे तरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ८ येथील दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदी लागू राहतील. |

३. तसेच संदर्भाधीन क्र. ७ येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ११ जुलै, २०१६ च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. ३, ४, ५ व ६ मधील तरतुदी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३०४१३१८३१२५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vijay Eknath Sable
Date: 2017.03.04 13:20:45 +05'30'

**( विजय साबळे )**
शासनाचे अवर सचिव

**प्रत,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),
४. महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-नागपूर-२, महाराष्ट्र (५ प्रती),
६. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. संचालक, तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय, महाराष्ट्र शासन,
१०. संचालक, तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय, महाराष्ट्र शासन,
११. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण/कला / ग्रंथालय,
१४. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
१५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१७. निवड नस्ती (विशि-१).